# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०८.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०७.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०५ ईसमांवर कारवाई करून ११,१०१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून १,११,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५९४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,२६,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०७.०६.२०२६ चे १९.०५ वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सुदामनगरी, बालपांडेचे घरामागे एक खाकी टि शर्ट व निळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेला इसम तलवार घेऊन धुमधाम करीत आहे. अशा प्राप्त माहितीवरुन पंचासमक्ष नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहून पळु लागल्याने त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील तलवार काढून घेतली. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सिदंधांत उर्फ सिदधु शिवनाथ भारद्वाज वय १९ वर्षे रा. संजय नगर, सरकारी दवाखान्याजवळ, अंबाझरी, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातून एक सिल्व्हर रंगाची तलवार किंमती ६००/— रू. ची जप्त करण्यात आली. आरोपी धुमधाम करीत असलेल्या ठिकाणी पाहणी केली असता, एका झाडाजवळ ओढणीमध्ये काहीतरी गुंडाळलेले दिसल्याने पाहणी केली असता, त्यामध्ये एक लोखंडी तलवार, एक बेसबॉल बॅट व तीन नग चायना चाकू मिळून आल्याने आरोपीकडून एकूण ३,२००/— चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रे बाळगुन धुमधाम करतांना मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि क्र. २), मा. श्री. किरण पोपळघट, सहा. पोलीस आयुक्त

(सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि विनोद गोडबोल, पोउपनि राजेश लोही, पोहवा बलजीत, पोअ राजु तायडे, प्रविण लोखंडे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०६.२०२६ चे १९.३० वा. ते दिनांक ०७.०६.२०२६ चे १४.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. ०२, संत गजानन नगर, नारा रोड, जरीपटका नागपुर येथे राहणारे फिर्यादी भुषण मोहन प्रसाद वय ३५ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवार व मित्र मंडळीसह पिकनिक करीता सावनेर रोड येथील रिसोर्टवर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे किचनरुमचे दाराला धक्के मारुन कडी—कोंडा तोडुन, आत प्रवेश करुन, लोखंडी आलमारीतील रोख ३७,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,२२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. अनिल म्हस्के ९६८९८७७८८८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सोनेगाव :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी श्री अंगद गुलाब खैरे वय ३९ वर्षे रा. घर क्र. ३९५, पांडे ले आऊट, मंगलधाम सोसायटी कोराडी रोड, नांदा, नागपूर यांचे मित्र बाबुराव यादव यांचा मिहान नागपूर येथे डी.वाय.पाटील क्रिकेट क्लब असल्याने फिर्यादी हे त्यांना भेटण्याकरीता व क्रिकेट खेळण्याकरीता जात असतात. तेथे फिर्यादी यांचा परिचय क्रिकेट खेळण्याकरीता येणारा आरोपी विवेक श्याम कांबळे वय २९ वर्ष रा. प्लॉट क्र. १२६, द्वारकानगरी, सेक्टर क्र. १३, चिखली प्राधिकरण, चिंचवड, पुणे याचेसोबत झाली होती. त्याने तो महाराष्ट्र वन विभाग मध्ये उच्चपदस्थ अधिकारी असल्याचे व टेंडर हेड असल्याचे सांगून त्याचे ओळखपत्र सुदधा दाखविले होते. त्याने वन विभागातील कामाचे अनेक लोकांना टेंडर मिळवून दिल्याचे सांगितले होते. त्याचे राहणीमान व ओळखपत्र पाहून फिर्यादीचा त्याचेवर विश्वास बसला. आरोपी याने फिर्यादीस वनविभागाचे टेंडर मिळवून देण्याकरीता सर्वप्रथम कंपनी स्थापन करुन जीएसटी रजिस्टर करावे लागेल असे सांगितले. फिर्यादी यांनी दक्षिता इंटरप्रायझेस नावाने कंपनी स्थापन केली. आरोपी याने फिर्यादीस तुमची कंपनी वन विभागाची अधिकृत वेंडर नसल्याने त्याचे परिचीत साई इंटरप्रायझेस कडून केबल परचेस करावे लागेल व दुसऱ्या कंपनीला सप्लाय करावे लागेल असे सांगितले. आरोपीने सांगितल्याप्रमाणे फिर्यादी यांनी त्याने दिलेल्या खाते क्रमांकावर ६,४४,०००/— रु. पाठविले. त्यांनतर आरोपीने टाळाटाळ करून फोन उचलने बंद केल्याने फिर्यादी यांनी खात्री केली असता, आरोपी वनविभागात नौकरीवर नसल्याचे समजले. फिर्यादीने साई इंटरप्रायझेसचे मालक नागेश उत्तेकर यांना भेटले असता, त्यांनी रक्कम आरोपीचे खात्यावर वळते केल्याचे सांगितले. आरोपी याने नागेश उत्तेकर व त्यांचे मित्र आकाश हजारे यांना तो मेट्रोमध्ये अधिकारी असल्याचे सांगून टेंडर मिळवून देण्याचे बहाण्याने रक्कम घेतल्याचे समजले. आरोपी याने फिर्यादीचे मित्र बाबुराव यादव यांना सुदधा त्याचे नातेवाईकाला नौकरी लावून देतो असे सांगून फसवणूक केल्याचे सांगितले. आरोपी याने दिनांक ०१.१०.२०२५ ते दिनांक २८.०२.२०२६ चे दरम्यान फिर्यादी व इतर एकूण १९ लोकांना वनविभागात, मेट्रो कंपनीत टेंडर मिळवून देण्याचे व नौकरी लावून देण्याचे आमिष दाखवून त्यांचेकडून वेळोवेळी रकमा घेऊन फिर्यादी व इतर १९ यांचा अन्यायाने विश्वासघात करुन एकूण ९२,४४,०००/— रु. ची आर्थिक फसवणूक केली.

यााप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. युवराज सुर्यवंशी ९८२३५६३६०८ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१९(२),३१८(४),३३६(२),३३६(३),३४०(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**सोनेगाव पोलीसांचे आवाहन :–** जनतेला याद्वारे आवाहन करण्यात येते की, वरीलप्रमाणे कोण्याही इसमाची वरील आरोपींने टेंडर मिळवुन देण्याचे किंवा नौकरी लावुन देण्याचे आमिष दाखवुन कोणाचीही फसवणुक केलेली असल्यास, त्यांनी पोलीस ठाणे सोनेगाव येथे संबंधीत कागदपत्रांसह प्रत्यक्ष तसेच, ०७१२–२२८४११० फोन क्रमोकावर संपर्क साधावा.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे लकडगंज :–** दिनांक ०५.०६.२०२६ चे २३.२५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्यीत, छापरु नगर, फुटपाथवर एक अनोळखी इसम वय अंदाजे ५५ वर्ष वयाचे आजारी व बेशुदध अवस्थेत दिसल्याने मानव सेवा ट्रस्टचे कर्मचारी श्री सचिन सचदेवे यांनी त्यांना मेयो हॉस्पिटल येथे वार्ड क्र. ३१ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०८.०६. २०२५ चे ०६.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यााप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि संदीप शिंदे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**